| MHAH150015032022 | केस दाखल दिनांक | १८/०८/२०२२ |
| --- | --- | --- |
| | केस नोंदणी दिनांक | १८/०८/२०२२ |
| | केस निकाल दिनांक | ०९/०३/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०३ ०६ २२ |

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.१, नेवासा यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी - डॉ. पी. आर. सुगांवकर)

फौ.कि.अ.क्र.९६/२०२२
नि.क्र. १८

१. सौ. उर्मिला सागर ताजणे,
वय-२१ वर्षे, धंदा - काहीनाही
रा. ह.मु. व्दारा उत्तम गोरख शिंदे,
रा. पिचडगाव, नेवासा, जि.अहमदनगर.
लग्नापुर्वीचे नाव उर्मिला उत्तम शिंदे

...अर्जदार

विरुध्द

१. सागर लहानु ताजणे,
वय - ३४ वर्ष, व्यवसाय - नोकरी व शेती,
रा. रामाचे पिंपळस, ता.निफाड, जि.नाशिक, ...सामनेवाले

वकिलपक्ष - ----------------------------------------------------------------
अर्जदारातर्फे विधीज्ञ - ॲड. पी.व्ही.नाईक
सामनेवालांतर्फे विधीज्ञ - ॲड. ए.टी.आगळे
------------------------------------------------------------

न्यायनिर्णय

(घोषित दिनांक - ०९/०३/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे सामनेवाल्याकडुन पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

सदर अर्ज दाखल करण्यास कारणीभुत ठरलेली पार्श्वभुमी थोडक्यात खालीलप्रमाणे -

२. अर्जदाराचे असे कथन असे आहे की, अर्जदार व सामनेवाला यांचे लग्न हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे दि.१४.०७.२०२० रोजी थाटामाटात, संपुर्ण संसार उपयोगी साहित्य, सोन्याची दागदागिणे, मानपानासह व वर दक्षिणा देवुन अर्जदाराच्या आई-वडिलांच्या घरी

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.03.09 12:19:50 +0530

झाले. लग्नानंतर अर्जदार नांदण्यास सासरी रामाचे पिंपळस, ता.निफाड, जि.नाशिक येथे गेली. त्याठिकाणी सामनेवाला, सासरा लहानु सासु ज्योती, दिर गौरव असे एकत्र राहु लागले. लग्नानंतर अर्जदारास सुमारे २ ते ३ महिने सामनेवाला यांनी कसेबसे नांदविले. परंतु त्यानंतर सामनेवाला व त्याच्या कुटूंबियांनी अर्जदाराकडे पुर्वी घेतलेले कर्ज फेडण्यासाठी र.रू. २,००,०००/- (र.रू. दोन लाख फक्त) रूपयाची मागणी केली व त्यावरून अर्जदारास मारहाण व शिवीगाळ करून उपाशी ठेवत होते. सदर घटनेबाबत अर्जदाराने तिच्या आई-वडिलांना कल्पना दिली. त्यावेळी अर्जदाराच्या आई-वडिलांनी सामनेवाला याला र.रू. २,००,०००/- (र.रू. दोन लाख फक्त) रोख स्वरूपात दिले. परंतु त्यानंतरही सामनेवाला अर्जदाराकडे आणखी र.रू. २,००,०००/- (र.रू. दोन लाख फक्त) रूपयाची मागणी करू लागले व त्याकारणावरून तिचा छळ करू लागले. सामनेवाला यास दारूचा, मटक्याचा, ऑनलाईन पत्त्यांचा नाद असुन त्या पायी तो येणारे पगाराचे पैसे उडवितो. दरम्यान सामनेवाला हा अर्जदारास त्याच्या नोकरीच्या ठिकाणी नाशिक येथे घेवुन गेला व त्या ठिकाणी सामनेवाला हे भाडोत्री खोलीमध्ये रहात होते. त्या ठिकाणी गेल्यावर सामनेवाल्याच्या वागण्यात बदल झाला नाही. सामनेवाला ४ - ५ दिवस घरी येत नसत. घरगुती वस्तुंची तजवीज करत नसे, भाडे वेळेवर देत नसे, त्यावेळी सामनेवाल्यास समजावुन सांगितले असता तो म्हणत असे की, मला माझ्या वैयक्तिक खर्चासाठी व व्यसनासाठी पैसे पुरत नाहीत. त्यामुळे तु तुझ्या आई-वडिलांकडुन दरमहा पैसे मागुन घे व त्यातुन घरभाडे व घर खर्च चालवित जा. घर मालकाने घर भाडयाचा जास्त तगादा लावल्यामुळे व अर्जदाराच्या खाण्यापिण्याचे हाल होत असल्यामुळे अर्जदाराने तिच्या आई-वडिलांकडुन काही रकमेची मागणी केली. त्यावेळी वेळो वेळी अर्जदाराच्या आई-वडिलांनी ४ ते ५ वेळेस र.रू. १५,०००/- (र.रू.पंधरा हजार फक्त) अर्जदारास दिले. त्यानंतर अर्जदाराने सामनेवाल्यास पुढे शिक्षण घ्यायचे आहे, असे म्हणाले असता सामनेवाला हा पुढील शिक्षणासाठी, नविन फ्लॅट घेण्यासाठी र.रू. ५,००,०००/- (र.रू. पाच लाख फक्त) रूपयांची मागणी करू लागला. परंतु अर्जदाराने आई-वडील एवढी रक्कम देवू शकत नाही, असे म्हणताच सामनेवाला याने अर्जदाराला बेदम मारहाण केली व तिच्या वडीलांना फोन करून सांगितले की, तुम्ही जर मला र.रू. ५,००,०००/- (र.रू. पाच लाख फक्त) दिले, तरच मी तुमच्या मुलीला नांदवेल, अन्यथा तुम्ही तुमच्या मुलीला इकडे येवून घेवून जा. त्याप्रमाणे दुस-या दिवशी अर्जदाराचे वडील दि. ०१.०४.२०२२ रोजी सामनेवालाकडे गेले असता सामनेवाला याने त्यांच्याकडे पैश्याची मागणी केली. त्यास नकार देताच सामनेवालाने अर्जदारास तिच्या वडीलासमोर मारहाण करून, तिला एका वस्त्रानिशी वडीलांसह हाकलुन दिले. तेव्हा पासुन अर्जदार ही तिच्या आई -वडिलांकडे आश्रीत म्हणुन जगत आहे. अर्जदाराने सामनेवालाकडे नांदण्यासाठी प्रयत्न केला. परंतु सामनेवाला याने र.रू. ५,००,०००/- (र.रू. पाच लाख फक्त) दिल्याशिवाय अर्जदारास नांदविण्यास स्पष्ट नकार दिला. त्यानंतरही सामनेवाला व त्याच्या

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.03.09 12:19:56 +0530

नातेवाईकांनी अर्जदाराच्या आई-वडिलांच्या घरी येवुन र.रू.५,००,०००/- (र.रू. पाच लाख फक्त) मागणी केली. अशा प्रकारे सामनेवालाने अर्जदाराचा स्वत:हुन त्याग केलेला आहे. सामनेवाला याने अर्जदाराच्या खाण्यापिण्याची कोणत्याही व्यवस्था केली नाही व ती तिच्या आई-वडिलांकडे हालाखीत जीवन जगत आहे. सामनेवालाने केलेल्या मारहाणीमुळे अर्जदारास कामधंदा होत नाही. याउलट सामनेवाला हा खाजगी कंपनीत नोकरीस असुन त्यास दर महा. ३५,०००/- (र.रू. पसतीस हजार फक्त) ते ४०,०००/- (र.रू. चाळीस हजार फक्त) पगार आहे. तसेच सामनेवाला याची वडिलोपार्जित मालकीची मौजे. रामाचे पिंपळस येथे ४ ते ५ एकर बागायत शेतजमीन असुन त्यामध्ये त्याला दरवर्षी र.रू. ५,००,०००/- (र.रू. पाच लाख फक्त) ते र.रू. १०,००,०००/- (र.रू. दहा लाख फक्त) रूपयाचे उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला याला दुग्ध व कुक्कुट पालणाच्या व्यवसायापासुन दर महा र.रू. २,००,०००/- (र.रू. दोन लाख फक्त) ते र.रू. ३,००,०००/- (र.रू. तीन लाख फक्त) रूपयाचे उत्पन्न मिळते. अशा प्रकारे सामनेवाला हा चैनित जीवन जगत असुन अर्जदार ही हालाखीत जीवन जगत आहे. सामनेवाला याने अर्जदाराची कोणत्याही पोटगीची व्यवस्था केली नाही. त्यामुळे अर्जदाराने सामनेवालाकडुन दर महा. र.रू. २०,०००/- (र.रू. वीस हजार फक्त) अन्न वस्त्र पोटगी मिळणेकामी प्रस्तुत चाअर्ज दाखल केला आहे.

३. सामनेवाला याने नि.१७ खाली त्यांचे म्हणणे दाखल केले असुन त्यांनी अर्जातील सर्व कथन अमान्य केले आहे. पुढे त्याने असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाला यांचे लग्न कोव्हीड निर्बंधामध्ये मोजक्या लोकात पार पडले. सदर विवाहात सामनेवाला व त्याच्या कुटूंबियांनी अर्जदाराच्या अंगावर तीन तोळयाचे सोन्याचे दागदागिणे घातले. लग्नानंतर अर्जदार ही सामनेवालाकडे नांदायला आल्यानंतर अर्जदाराचे काही दिवसात फोनवर बोलणे सुरू झाले. सुरूवातीला सामनेवाला व त्याच्या घरच्यांना वाटले की, ती तिच्या आई-वडिलांसोबत बोलत असेल म्हणुन त्यांनी अर्जदाराच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. परंतु अर्जदार ही रात्री अपरात्री उठुन मोबाईल घेवुन हॉट्सअपवर चाटींग करत बसत असे, बाहेर जावुन फोनवर बोलत असे, त्यामुळे सामनेवाला व त्याच्या कुटूंबाचा अर्जदारावर संशय निर्माण झाला. त्यानंतर एके दिवशी मध्यरात्री सामनेवाला व त्याचे घरचे सर्वजण गाढ झेपेत असतांना अर्जदाराने नेहमीप्रमाणे मोबाईल घेवुन हॉट्सअपवर कोणासोबत तरी चाटींग करण्यास सुरवात केली. त्यावेळी सामनेवाला याला अचानक जाग आली. त्याने अर्जदाराचा मोबाईल चेक केला असता व फोनमधील हॉट्सअप चाटींग वाचली असता सामनेवाल्याच्या लक्षात आले की, अर्जदाराचे कुणातरी मुलाबरोबर प्रेम संबंध आहेत. त्यामुळे सामनेवाला याला मोठा मानसिक धक्का बसला. त्यानंतर सामनेवालाने सदर घटनेबाबत दुस-या दिवशी मध्यस्थी मच्छींद्र गायकवाड यांना सांगितले. त्याने अर्जदाराच्या आई-वडील व नातेवाईकांना बोलावुन अर्जदाराच्या प्रेमसंबधाबाबत माहिती दिली व त्याबाबत त्याने

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.03.09 12:20:03 +0530

अर्जदाराकडे विचारणा केली असता तिने लग्नापुर्वी पासुन एका मुला सोबत प्रेम संबंध असल्याबाबत सर्वा समक्ष मान्य केले. त्यानंतर अर्जदाराने सर्वा समक्ष सामनेवाला व त्याच्या घरच्यांची माफी मागुन या पुढे अशी चुक होणार नाही, अशी खात्री दिली. त्यामुळे सामनेवाले तिला नांदविण्यास तयार झाले. त्यानंतर काही महीने अर्जदार ही व्यवस्थीत नांदली व सामनेवाला याच्याकडे नाशिक येथे जावुन राहण्यासाठी हट्टी करू लागली. त्यामुळे सामनेवाला हा तिला राहण्यासाठी नाशिक येथे घेवुन आला. तेथे ती बाहेर जेवणाचा हट्ट करीत असे, तसेच तिने जानेवारी २०२२ मध्ये तिच्या इच्छे खातर चांदवड, नाशिक येथे एल.एल.बी ची सी.ए.टी दिली होती. सामनेवाला हा कामावर गेल्यानंतर अर्जदार ही बाहेर कुठेतरी निघुन जात असे, गावाकडच्या मित्र- मैत्रिणीला बोलुन दिवसभर फिरत असे, सामनेवाल्याचे कपडे धुत नसे, जवेणाचा डब्बा देत नसे, घरातील किराणा संपला तरी सांगत नसे, आजारी पडली तरी दवाखान्यात जाण्यास नकार देत असे. अशा प्रकारे अर्जदार ही सामनेवाला याला मानसिक त्रास देत होती. नाशिक येथे आल्यानंतर ही अर्जदाराचे फोनवर बोलणे चालुच होते. त्याबाबत सामनेवालाने विचारणा केली असता ती वाद घालत असे, त्यामुळे सामनेवाला याची खात्री झाली की, अर्जदाराचे पुर्वीपासुनचे प्रेमसंबध आज ही आहेत. अर्जदाराच्या मोठया बहिणीने अंतरजातीय प्रेम विवाह केला, त्यामुळे अर्जदाराच्या आई-वडिलांनी तिच्याशी नातेसंबंध तोडले. त्यानंतर अर्जदाराचे वडील हे गपचुपपणे अर्जदाराच्या बहिणीला व तिच्या नव-याला सामनेवाला राहत असलेल्या नाशिक येथील घरी घेवुन आले. त्या कारणावरून अर्जदार व सामनेवाला यांच्यात वाद होवू लागले. दि.१४.०३.२०२२ रोजी अर्जदार ही माझ्या भावाचा पेपर आहे, त्याचा अभ्यास घ्यायचा आहे, असे म्हणुन माहेरी जाण्याबाबत हट्ट करू लागली व तिने सामनेवाला याला काही न सांगता वडीलांना नाशिक येथे बोलवुन घेतले व काही न सांगता सर्व कपडे व सोन्याचे दागदागिणे घेवुन माहेरी निघुन गेली. सामनेवाला याने अर्जदारास पाडव्याच्या सणासाठी फोन केला असता अर्जदाराने सासरी येण्यास स्पष्ट नकार दिला. तसेच सामनेवाल्याच्या सास-यांनी अर्जदारास नांदण्यास पाठविण्यास नकार दिला. त्यानंतर दोन महीन्यांनी अर्जदाराच्या चुलत्यांनी सामनेवाला यांना सांगितले की, अर्जदाराच्या आई-वडिलांची तिला तुमच्याकडे नांदविण्याची मानसिकता दिसत नाही. त्यामुळे तुम्ही तिचा विचार सोडुन दया. तसेच त्यानंतर ही सामनेवाला याने अर्जदाराच्या वडीलास अर्जदारास नांदविण्यास पाठविण्यास विनंती केली असता, त्यांनी नकार दिला. अर्जदार ही अहमदनगर येथे मोठया ब्युटीपार्लरमध्ये काम करते व त्यापासुन तिला दर महा र.रू.१५,०००/- ( र.रू.पंधरा हजार फक्त) ते र.रू.२०,०००/- ( र.रू.वीस हजार फक्त) उत्पन्न मिळते व त्यातुनच ती स्वत:ची उपजिवीका भागविते. अर्जदाराने कोणत्याही कारणाशिवाय सामनेवालाचा त्याग केल्यामुळे सामनेवाला हा मानसिक दृष्टया खचुन गेला आहे. त्यामुळे त्याला कुठलाही कामधंदा होत नाही व त्याच्यावर त्याच्या आई वडीलांची, लहान भावाची व विवाहीत

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.03.09 12:20:09 +0530

बहिणीची जबाबदारी आहे व सामनेवाला हा अर्जदारास नांदविण्यास तयार आहे. त्यामुळे सामनेवाला याने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रस्तुतच्या प्रकरणात दोन्ही पक्षांना वारंवार संधी देवुनही त्यांनी युक्तीवाद केला नाही. त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण गुणावगुणावर निर्णीत करण्यात आले.

५. वरील विवेचनावरुन खालील वादप्रश्न माझे विचारार्थ येवुन मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सामनेवाला यास उत्पन्नाचे साधन असुनही त्याने अर्जदाराच्या पालनपोषणास नकार दिला असे अर्जदाराने शाबीत केले आहे काय ? | होय |
| २. | अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे अर्जदाराने शाबीत केले आहे काय ? | होय |
| ३. | अर्जदार ही सामनेवाला कडून पोटगीची रक्कम मिळणेस पात्र आहे काय ? | अंशतः होय |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

कारणमिमांसा

६. अर्जदार हिने आपली मागणी सिध्द करण्यासाठी स्वतःला नि.१० वर तपासले असुन साक्षीदार क्र.२ उत्तम गोरख शिंदे, तिचे वडील यांना, नि.११ खाली तपासले आहे, तसेच साक्षीदार क्र.३ सुमनबाई गोरख शिंदे, अर्जदाराची आज्जी, यांना नि.१२ खाली तपासले आहे. पुरावा संपल्याची पुरसिस अर्जदाराने नि.१३ वर दाखल केलेली आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात सामनेवाला याला वारंवार संधी देवुन देखील त्याने एकही साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे सामनेवालाचा पुरावा नि.१ खाली आदेश करून पुरावा बंद करण्यात आला. प्रस्तुत प्रकरणात दोन्ही पक्षांनी अंतिम युक्तीवाद केलेला नाही, त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण गुणावगुणावर निर्णीत करण्यात आले.

<u>वादप्रश्न क्र.१ ते ३ बाबत</u> -

७. वादप्रश्न क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संबंधीत असल्यामुळे त्यांचे विवेचन मी एकत्रित करित आहे. प्रस्तुतच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे पोटगी मिळणेबाबत दाखल केला आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रथम अभिलेखावर हे सिध्द होणे गरजेचे आहे की, सामनेवाला याला उत्पन्नाचे

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.03.09 12:20:15 +0530

साधन असुनही त्याने अर्जदाराचे पालन पोषण करण्यास नकार दिला आहे व अर्जदार ही स्वत:चे पालन पोषण करण्यास असमर्थ आहे. या अनुषंगाने उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदाराने तिच्या कथनाच्या पृष्ठर्थ स्वःला नि. १० वर तपासलेले असुन साक्षीदार क्र.२ म्हणुन तिचे वडील उत्तम गोरख शिंदे यांना नि.११ खाली तपासले आहे. तसेच साक्षीदार क्र.३ म्हणुन अर्जदाराची आज्ञी सुमनाबाई गोरख शिंदे यांना नि.१२ खाली तपासले आहे. प्रस्तुत तिनही साक्षीदारांनी अर्जदाराच्या कथनाच्या पुष्ठर्थ साक्ष नोंदविली आहे. पुढे साक्षीदार क्र.१ च्या उलट तपासाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तिने तिचे लग्न कोव्हीड निर्बंधामध्ये झाल्याचे मान्य करून ती लग्नाच्या वेळी बारावी पर्यंत शिकलेली होती व तिने चांदवड येथे जावुन एल.एल.बी सी.ए.टी चा फॉर्म भरला होता, हे मान्य केले आहे. तसेच तिने दि. ०२.०४.२०२२ रोजी पाडव्याच्या दिवशी ती माहेरी होती व सध्या ती अभियांत्रिकेचे शिक्षण घेत असुन दुसरे वर्ष चालु आहे, हे मान्य केले आहे. पुढे तिने सामनेवाला हा तिला घेवुन जाण्यास तयार असला तरी ती नांदायला जाण्यास तयार नाही, कारण तो तिला शारिरीक त्रास देतो, असे नमुद केले आहे. उर्वरीत सर्व सुचक प्रश्नांची तिने नकारार्थी उत्तरे दिली आहेत. अशा प्रकारे सदरील साक्षीदाराच्या उलट तपासाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सामनेवाला हा इपॉस कंपनीत काम करतो व ती सामनेवाल्याच्या उत्पन्नाबाबत पुरावा न्यायालयात दाखल करू शकत नाही. साक्षीदार क्र.२ ने त्याच्या उलट तपासादरम्यान त्याच्या मोठया मुलीचा अंतरजातीय प्रेम विवाह झाला असल्याचे मान्य केले आहे व तसेच त्याने देखील दि. ०२.०४.२०२२ रोजी त्याची मुलगी माहेरी असल्याची बाब मान्य केली आहे. पुढे त्याने सामनेवाल्याच्या उत्पन्नाबाबत त्याचे पगारपत्रक त्याची मुलगी न्यायालयात हजर करू शकते, असे कथन करून उर्वरीत सर्व सुचक प्रश्नांची त्याने नकारार्थी उत्तरे दिली आहे. साक्षीदार क्र.३ ने देखील तिच्या उलट तपासादरम्यान अर्जदार ही लग्नानंतर नाशिक येथे राहण्यासाठी सामनेवाला याच्या सोबत गेली होती व त्यावेळी ती इयत्ता बारावी पर्यंत शिकलेली होती व तिने चांदवड येथे जावुन एल.एल.बी.सी.ए.टी फॉर्म भरला होता, ही बाब मान्य केली आहे. पुढे तिने सामनेवाला यास तीस ते पसतीस हजार पगार असल्याचे पगारपत्रक अर्जदार न्यायालयात हजर करू शकते, असे कथन केले आहे. उर्वरीत सर्व सुचक प्रश्नांची तिने नकारार्थी उत्तरे दिली आहे. अशा प्रकारे सदरील तीनही साक्षीदारांनी अर्जाच्या कथनाच्या पुष्ठर्थ साक्ष नोंदविली आहे. या उलट सामनेवाला याने अर्जदाराचे कथन खोडुन काढण्याकरीता कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अशा प्रकारे अर्जदाराचा तोंडी पुरावा अभिलेखावर अबाधित राहिल्याचे दिसुन येते. तसेच सदरील तीनही अर्जदाराच्या साक्षीदारांच्या उलटतपासातुन अर्जदाराला आज रोजी उत्पन्नाचे साधन आहे, ही बाब अभिलेखावर येत नाही. वस्तुत: फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ च्या अनुषंगाने अभिलेखावर केवळ हे येणे अपेक्षित आहे की, सामनेवाला हा शारीरीक दृष्टया सक्षम

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.03.09 12:20:21 +0530

आहे. परंतु या अनुषंगाने उपलब्ध प्रकरणाचे अवलोकन केले असता सामनेवाला शारीरीक दृष्टया असक्षम आहे, या अनुषंगाने कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. पुढे अर्जदाराने अभिलेखावर सामनेवाल्याच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केल्याचे दिसुन येत नाही. त्याच प्रमाणे सामनेवाला याने आजरोजी अर्जदाराच्या पालन पोषणाची व्यवस्था केल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे मला असे वाटते की, सामनेवाला याला उत्पन्नाचे साधन असुनही त्याने अर्जदाराचे पालन पोषण करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे मी वादप्रश्न क्र.१ चे उत्तर होय असे देते. पुढे अर्जदार ही स्वत:चे पालन पोषण करण्यास सक्षम आहे, या अनुषंगाने कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. या उलट प्रस्तुत अर्जान्वये अर्जदार ही सामनेवालाकडुन पोटगीची मागणी करीत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे मला असे वाटते की, अर्जदार ही स्वत:चे पालन पोषण करण्यास असक्षम आहे. त्यामुळे मी वादप्रश्न क्र.२ चे उत्तर होय असे देते. त्यामुळे मला असे वाटते की, अर्जदार ही सामनेवालाकडुन पोटगी मिळण्यास पात्र आहे.

८. पुढे एखाद्या प्रकरणात पोटगीची रक्कम विचारात घेत असतांना, अर्जदाराची गरज, सामनेवालाची ऐपत, दोन्ही पक्षांचा सरासरी राहणीमानाचा दर्जा व दैनंदिन महागाई याचा घटकाचा विचार करणे गरजेचे आहे. या अनुषंगाने सारासार विचार करता, उपलब्ध पुराव्यावरुन मला असे वाटते की, अर्जदार ही सामनेवाल्या कडून र.रू २०००/- प्रतिमहा एवढी पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन मिळणेस पात्र आहे. त्यामुळे मी वादप्रश्न क्र.३ चे उत्तर अंशत: होय असे देवून वादप्रश्न क्र.४ बाबत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करते-

| आ दे श | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | सामनेवाला याने अर्जदाराला दरमहा र.रु२,०००/-(रक्कम रुपये दोन हजार मात्र), पोटगी अर्ज दाखल तारखेपासून द्यावी. |
| ३. | प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रु. २,०००/- (रक्कम रुपये दोन हजार मात्र) सामनेवाला यांनी अर्जदारास द्यावा. |
| ४. | सदर न्यायनिर्णयाची एक प्रत अर्जदारास व सामनेवाल्यांना विनामुल्य देण्यात यावी. |

(सदरहू न्यायनिर्णय खुले न्यायालयात घोषित केला. )

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.03.09 12:20:27 +0530

(श्रीमती डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.

दि. ०९/०३/२०२६
ठिकाण - नेवासा.